# एम. एम. पोतदार, न्यायिक सदस्य, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, कॅम्प पुणे यांचे समोरील कामकाज

**Revision Application No.TNC/REV/63/B/2008/SS**

कृष्णा रामा पवार, रा.ऐनवाडी, ता.खानापूर, जि.सांगली ---अर्जदार

**विरूध्द**

१) श्रीम.द्रौपदी बाळासाहेब पाटील, रा.ऐनवाडी, ता.खानापूर, जि.सांगली
२) श्रीम.इंदूबाई प्रल्हाद इंगळे, रा.भेंडवडे, ता.खानापूर, जि.सांगली
३) श्रीम.शालन नवनाथ मोरे, रा.हणमंतवडीये, ता.कडेगांव, जि.सांगली
४) श्रीम.प्रमिला रंगराव मोरे, रा.हणमंतवडीये, ता.कडेगांव, जि.सांगली ---जाबदेणार

**मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८**
**[ संक्षिप्त रुपाने "कुळकायदा" म्हणून संबोधिले आहे. ]**
**चे कलम ७६ नुसार रिव्हिजन अर्ज.**

## न्या य नि र्ण य

(निकाल दिनांक २६ /०२/२०१९)

१] उपविभागीय अधिकारी, खानापूर उपविभाग विटा यांनी टेनन्सी अपील क्र.१५/२००६ मध्ये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम २५८ नुसार दि.७/१/२००८ रोजी दिलेल्या निर्णयाविरूध्द प्रस्तुचा पुनर्रीक्षण अर्ज आहे.

२] उपविभागीय अधिकारी यांनी वरील निर्णयानुसार त्यांचेकडील टेनन्सी अपील क्र.२/२००५ मधील दि.१०/१०/२००६ रोजीचा निर्णय रद्द करून टेनन्सी अव्वल कारकून यांनी टेनन्सी केस नंबर ६८/२००४ मध्ये दि. १२/१/२००५ रोजी जो निर्णय दिला होता, तो देखील रद्द केला आहे.

३] टेनन्सी अव्वल कारकून खानापूर विटा यांनी कृष्णा रामा पवार तर्फे कुलमुखत्यार श्री.प्रकाश कृष्णा पवार यांचा दिनांक नसलेला अर्ज मंजूर करून मौजे ऐनवाडी येथील शेतजमीन गट नंबर १४९, १६५, १६८, २७६, ५८७, ५८३ या शेतजमिनीच्या कब्जेदार व वहिवाट सदरी कृष्णा रामा पवार यांचे नांव दाखल करावे असा आदेश दिला होता.

त्या निर्णयाविरूध्द त्या अर्जातील जाबदेणार श्रीम.द्रौपदा बाळासाहेब पाटील हिने उपविभागीय अधिकारी, खानापूर उपविभाग विटा ह्यांचेकडे टेनन्सी अपील क्र.२/२००५ हे दाखल केले. तथापि उपविभागीय अधिकारी यांनी ते अपील दि.१०/१०/२००६ रोजी फेटाळून लावले व टेनन्सी अव्वल कारकून यांचा निर्णय कायम केला.

Scanned with OKEN Scanner

४] पुढे श्रीम.द्रौपदा बाळासाहेब पाटील हिने उपविभागीय अधिकारी यांच्या वरील निर्णया विरूध्द RTS/टेनन्सी रिव्ह्यू / [फेरतपासणी] अर्ज नं. १५/२००६ हा दाखल केला.

५] उपविभागीय अधिकारी, खानापूर उपविभाग, विटा यांनी तो फेरतपासणी अर्ज दि.७/१/२००८ रोजी मंजूर केला. त्या निर्णयावर नाराज होवून मुळ अर्जदार कृष्णा रामा पवार यांनी प्रस्तुतचा रिव्हिजन / पुनरीक्षण अर्ज दाखल केला असून तो चौकशीस घेतला आहे.

६] रिव्हिजन अर्जदारचे वतीने केलेला युक्तीवाद ऐकला. जाबदेणार यांचे तर्फे कोणीही हजर नव्हते त्यामुळे त्यांचे वतीने कोणताही युक्तीवाद करण्यात आलेला नाही.

७] वरील पार्श्वभूमीवर उपविभागीय अधिकारी खानापूर उपविभाग, विटा यांनी फेर तपासणी अर्ज क्र.१५/२००६ मध्ये दि. ७/१/२००८ रोजी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २५८ नसार जो निर्णय दिला आहे तो योग्य व कायदेशीर आहे काय ? त्यामध्ये हस्तक्षेपाची आवश्यकता आहे काय हे मुद्दे न्यायनिर्णयासाठी उपस्थित होतात.

८] उपविभागीय अधिकारी, खानापूर उपविभाग, विटा यांचा प्रश्नाधीन निर्णय मुळातच योग्य व कायदेशीर नाही कारण मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ मधील तरतुदीनुसार संबंधीत शेतजमीन न्यायाधिकरणाकडे प्रकरण चौकशीस येवून त्यावर निर्णय झाल्यास त्यावरील अपील किंवा रिव्हीजन म्हणजे पुनर्रीक्षण अर्ज हे त्या अधिनियमातील तरतुदीनुसार त्यात नमूद केलेल्या अधिकाऱ्याकडेच चौकशीला घेतले जाते आणि त्याचा निर्णय हा त्या अधिनियमातील तरतुदीस अनुसरूनच द्यावयाचा असतो व तसे त्या अधिनियमानुसार अपेक्षित देखील आहे.

९] प्रस्तुत प्रकरणी उपविभागीय अधिकारी खानापूर उपविभाग विटा यांनी सुरूवातीला टेनन्सी अपील क्र. २/२००५ मध्ये दि. १०/१०/२००६ रोजी जो निर्णय दिला त्याविरूध्द नाराज पक्षकारांनी महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ मधील कलम ७६ नुसार पुनर्रीक्षण अर्ज करून दाद मागणे योग्य व कायदेशीर होते. त्यांनी तसे न करता त्याच उपविभागीय अधिकाऱ्याकडे RTS/टेनन्सी रिव्ह्यू/[फेरतपासणी] अर्ज नं. १५/२००६ हा "महाराष्ट्र लॅण्ड रेव्हेन्यू कोड २५८ " अन्वये दाखल केला. उपविभागीय अधिकारी यांनी ते प्रकरण महाराष्ट्र महसूल अधिनियम १९६६ खाली दाखल करून न घेता संबंधीत पक्षकारांना मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ मधील कलम ७६ नुसार महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे पुनर्रीक्षण अर्ज दाखल करण्यास आदेशित करणे योग्य व कायदेशीर होते. परंतु तसे केल्याचे दिसत नाही.

Scanned with OKEN Scanner

१०] महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम २५८ नुसार, मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ खाली दिलेले निर्णय पुर्नविलोकनासाठी घेण्याचे अधिकार उपविभागीय अधिकारी यांना नाहीत. पुर्नविलोकनाचे अधिकार महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील प्रकरण १५ कलम ३२२ नुसार फक्त महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणांसच आहेत. महाराष्ट्र महसूल जमीन न्यायाधिकरण फक्त कुळ कायद्यांतर्गत पुनर्रीक्षण अर्जाचा निर्णय पुर्नविलोकीत करू शकते.

११] महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम २५८ नुसार त्या अधिनियमांतर्गत आदेशांचे पुर्नविलोकन उपविभागीय अधिकारी यांनी करावयाचे झाल्यास आयुक्तांची परवानगी घ्यावी लागते. परवानगीशिवाय आदेशाचे पुर्नविलोकन करता येत नाही. प्रस्तुत प्रकरणांत उपविभागीय अधिकारी खानापूर उपविभाग विटा यांनी टेनन्सी अपील क्र.२/२००५ मधील दि. १०/१०/२००६ रोजीचा आदेश पुर्नविलोकनासाठी, घेता येत नाही ही गोष्ट वेगळी तरी देखील वादाकरिता तो घ्यावयाचा झाल्यास, आयुक्त यांची परवानगी घेतली नसल्याने उपविभागीय अधिकारी यांचा आदेश कायदेशीर व योग्य नाही त्यामुळे तो रद्दबातल आहे.

१२] प्रस्तुत प्रकरणामध्ये कृष्णा रामा पवार यांनी टेनन्सी अव्वल कारकून खानापूर (विटा) यांच्याकडे विना तारखेचा अर्ज करून, "त्यात नमूद केलेल्या जमिनीबाबत या पूर्वी झालेल्या नोंदी तपासून कुळ कायद्यातील तरतूदीनुसार त्याला मालकी हक्क प्राप्त करून द्यावा व पूर्वी झालेल्या निर्णय नोंदी रद्दबातल ठरत असल्याने त्या रद्द करण्यात याव्यात" अशी विनंती केली होती.

१३] कुळ वहिवाट अव्वल कारकून खानापूर विटा यांनी त्या अर्जाचा निर्णय दि. १२/१/२००५ रोजी देऊन "दावा जमिनीच्या कब्जेदार व वहिवाट सदरी श्री.कृष्णा रामा पवार यांचे म्हणजे अर्जदाराचे, नांव दाखल करावे व कब्जेदार सदरातील सर्व जाबदेणार यांची नांवे इतर हक्कात क. न. वारस म्हणून दाखल करावीत" असा आदेश दिला.

१४] तहसिलदार, खानापूर विटा यांचेकडून प्राप्त झालेली प्रकरणांची संचिका वाचून पाहता असे दिसते की मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ मधील प्रकरण ६ मध्ये कुळ कायद्यांतर्गत दाखल प्रकरणांची कशा रितीने किंवा पध्दतीने चौकशी करावी याची अनिवार्य तरतूद [mandatory provision] केलेली आहे. त्या तरतूदीनुसार संबंधीत पक्षकारांचे शपथेवर जाबजबाब नोंदवून मागणी केल्यास एकमेकांना उलट तपासाची संधी देवून त्या लेखी व तोंडी, कागदोपत्री पुराव्याचे न्याय बुध्दी वापरून मूल्यांकन करणे अनिवार्य असतांना देखील कुळ वहिवाट अव्वल

Scanned with OKEN Scanner

कारकून खानापूर विटा यांनी अशी अनिवार्य तरतूद असतांना देखील त्याप्रमाणे कार्यपध्दती न वापरता निर्णय दिला नसल्याने तो पूर्णतः चुकीचा, अयोग्य व बेकायदेशिर आहे त्यामुळे तो रद्दबातल आहे. नेमका हाच मुद्दा त्या अर्जातील जाबदेणार श्रीम.द्रौपदा बाळासाहेब पाटील हिने टेनन्सी अपील क्र.२/२००५ मध्ये उपस्थित केला होता.

१५] श्रीम.द्रौपदा बाळासाहेब पाटील हिचे अपीलामध्ये असे म्हणणे होते की, तिचे वडील चिंतु जोती पवार हे दावा मिळकतीचे कूळ होते. दावा जमिनीचा मालक कृष्ण रामा पवार हा होता. त्या दोघांमध्ये मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ मधील कलम ३२ ग प्रमाणे वाद जमिनीच्या किंमती ठरल्या होत्या. त्या चिंतु ने भरणा केल्या होत्या. त्यामुळे त्यांचे नांवे कलम ३२ एम प्रमाणे दाखले मिळाले होते. ती प्रकरणे सन १९६४ सालापासून ते सन १९७५ सालापर्यंत चाललेली होती.

१६] म्हणजेच मूळ जाबदेणार श्रीम.द्रौपदा पाटील हिच्या कथनाचा विचार केला तर मूळ जमीन मालक कृष्णा रामा पवार व कूळ चिंतु जोती पवार या दोघांमध्ये कुळ कायद्यांतर्गत प्रकरणे चालू होती. त्या प्रकरणांमध्ये वाद जमिनींच्या किंमती ठरल्या होत्या आणि चिंतु जोती पवार यांनी त्या किंमती भरल्याने त्यांचे नांवे कलम ३२एम चे दाखले मिळाले होते. अशा परिस्थितीत त्या जमिनींच्या हक्का बददल कृष्णा रामा पवार किंवा त्यांचे वारसांना कुळ कायद्यांतर्गत कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही. त्यामुळे कुळ वहिवाट अव्वल कारकून खानापूर विटा यांनी कृष्णा रामा पवार याचे दावा जमिनीच्या कब्जेदार व वहिवाट सदरी नांव दाखल करावे व कब्जेदार सदरातील सर्व जाबदेणांराची नांवे इतर हक्कात कब्जा नसलेले वारस म्हणून दाखल करावीत असा जो आदेश दिला आहे तो बेकायदेशिर आहे. वास्तविक पाहता कुळ वहिवाट अव्वल कारकून यांनी या बाबीकडे लक्ष देणे गरजेचे होते. परंतु त्यांनी त्याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष केल्याचे दिसते.

१७] या प्रकरणात आश्चर्याची बाब अशी की कृष्णा रामा पवार याचा अर्ज काळजीपूर्वक वाचला असता तो अर्ज आधीच टेनन्सी केस च्या क्रमांकासह छापून तयार होता असे दिसते. सर्वसाधारण परिस्थितीमध्ये एखाद्या पक्षकारांने तहसिलदार किंवा उपविभागीय अधिकारी किंवा कुळ वहिवाट अव्वल कारकून यांचेकडे अर्ज दाखल केल्यानंतर त्यांचे कार्यालयाकडून त्या अर्जाची नोंद घेतली जाते आणि नंतरच त्यावर केसचा क्रमांक लिहिला जातो. पण तसे या प्रकरणी झाल्याचे दिसत नाही. कृष्णा रामा पवार यांच्या मूळ अर्जावर टेनन्सी केस नंबर-६८/२००४ असा अगोदरच टंकलिखीत केलेला दिसतो त्यामुळे हे प्रकरण संशयास्पद दिसते.

Scanned with OKEN Scanner

या वरील सर्व बाबींचा साकल्याने विचार करता टेनन्सी अव्वल कारकून खानापूर यांनी टेनन्सी केस नंबर ६८/२००४ मध्ये दिलेला दि.१२/१/२००५ रोजीचा निर्णय व उपविभागीय अधिकारी, खानापूर विटा यांनी टेनन्सी अपील क्र.१५/२००६ मध्ये दिलेला दि. ७/१/२००८ रोजीचा निर्णय हे दोन्ही निर्णय योग्य व कायदेशीर नसल्याने त्यामध्ये हस्तक्षेपाची आवश्यकता आहे आणि म्हणून त्यामध्ये जरूर तो हस्तक्षेप करून खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आ दे श

१) प्रस्तुत पुनर्रीक्षण अर्ज खालील अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

अ) उपविभागीय अधिकारी, खानापूर विटा यांनी टेनन्सी अपील क्र. १५/२००६ मध्ये दिलेला दि.७/१/२००८ रोजीचा निर्णय हा योग्य व कायदेशीर नसल्याने तो रद्दबातल ठरविला आहे.

ब) कुळ वहिवाट अव्वल कारकून खानापूर विटा यांनी टेनन्सी केस नंबर ६८/२००४ मध्ये दि. १२/१/२००५ रोजीचा दिलेला निर्णय योग्य व कायदेशीर नसल्याने तोही रद्द करण्यात आला आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाहीत.

३) निर्णयाची समज उभय पक्षकार व खालील उभय न्यायाधिकरणांस कळवा.

४) खालील न्यायाधिकरणांचे अभिलेख तात्काळ परत पाठवा.

Scanned with OKEN Scanner